साप्ताहिक

“एकच ध्येय... एकच आवाज”

PRGI No. MAHMAR / 25 / A5304
पोस्ट परवाना नं. : DHL/642/2026-28

# प्रजा न्याय

संपादक – संजय अण्णा कुसळकर

Mob. : 9422798093 / 9028136953
Email - kusalkars@gmail.com
prajanyay@gmail.com

वर्ष-१ले | अंक १९ वा | सोमवार, दि. २५/०५/२०२६ ते दि. ३१/०५/२०२६ | पाने ४ | किंमत ३ रुपये

## बोगस दिव्यांग प्रमाणपत्र प्रकरण: रूपाली टेंगळेवरील कारवाईनंतर ’गणेश शहाणे’चे कृत्यही रडारवर; प्रशासकीय चौकशीची मागणी

धुळे – शासकीय योजना आणि सेवांचा अनधिकृत लाभ घेण्याच्या उद्देशाने बोगस दिव्यांग प्रमाणपत्र सादर करणाऱ्या रूपाली टेंगळे हिच्यावर अखेर कायदेशीर कारवाई सुरू करण्यात आली आहे. धुळे येथील श्री भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या विशेष वैद्यकीय मंडळाने (चशवळ-लरश्र इेरीव) सादर केलेल्या अधिकृत पडताळणी अहवालात टेंगळे हिचे अपंगत्व बोगस असल्याचे निष्पन्न झाले आहे. या कारवाईच्या पार्श्वभूमीवर, या रॅकेटमधील अन्य संशयित गणेश शहाणे याच्याही बोगस प्रमाणपत्राची सखोल चौकशी करून वस्तुनिष्ठ अहवाल शासनास सादर करावा, या मागणीसाठी सामाजिक कार्यकर्ते सरग सरग यांनी भाऊसाहेब हिरे शासकीय रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांची भेट घेऊन निवेदन सादर केले.

रूपाली टेंगळे हिने सादर केलेल्या दिव्यांग प्रमाणपत्राच्या वैधतेवर आक्षेप घेतल्यानंतर, सदर प्रकरणाची चौकशी धुळे येथील भाऊसाहेब हिरे शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या तज्ज्ञ समितीकडे सोपवण्यात आली होती. समितीने केलेल्या शास्त्रीय व वैद्यकीय तपासणीअंती टेंगळे हिचे अपंगत्व निकषात बसत नसल्याचे आणि सदर प्रमाणपत्र पूर्णतः ’बोगस’ असल्याचे स्पष्ट केले. या अहवालाच्या आधारे संबंधित विभागाने टेंगळे हिचे सर्व लाभ गोठवून तिच्याविरुद्ध फौजदारी गुन्हे दाखल करण्याची प्रक्रिया गतिमान केली आहे.



रूपाली टेंगळेवरील कारवाईनंतर हे बोगस प्रमाणपत्र रॅकेट अधिक व्यापक असण्याची शक्यता वर्तवली जात आहे. याच धर्तीवर, बोगस दिव्यांग प्रमाणपत्र धारक गणेश शहाणे याच्यावरही कायदेशीर कारवाई सुनिश्चित करण्यासाठी संजय सरग यांनी वैद्यकीय अधीक्षकांशी सविस्तर चर्चा केली. भेटीदरम्यान प्रामुख्याने खालील मागण्यांवर भर देण्यात आला. पारदर्शक अहवाल सादरीकरण: गणेश शहाणे याच्या दिव्यांग प्रमाणपत्राची वैद्यकीय निकषांनुसार पुनर्तपासणी करून, कोणत्याही दबावाला बळी न पडता वस्तुनिष्ठ व योग्य अहवाल तात्काळ शासनाकडे पाठवण्यात यावा. कायदेशीर प्रक्रियेत सहकार्य: शासनाची फसवणूक करणाऱ्या गणेश शहाणे याच्याविरुद्ध कठोर कायदेशीर पावले उचलण्यासाठी आणि त्याला वैद्यकीय स्तरावर सहकार्य करणाऱ्या घटकांचा शोध घेण्यासाठी प्रशासनाने सहकार्य करावे. सामाजिक कार्यकर्ते संजय सरग यांनी उपस्थित केलेल्या मुद्द्यांची दखल घेत, भाऊसाहेब हिरे रुग्णालयाच्या वैद्यकीय अधीक्षकांनी गणेश शहाणे प्रकरणाची नियमावलीनुसार पडताळणी करून, अचूक अहवाल वरिष्ठ पातळीवर पाठवण्याचे आणि कायदेशीर प्रक्रियेत पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन दिले आहे.

## शिरपूर येथे २८ मे रोजी जिल्हास्तरीय रोजगार मेळाव्याचे आयोजन

धुळे (जिमाका) – जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे व मॉडेल करिअर सेंटर, आणि आर. सी. पटेल आर्टस,कॉमर्स ॲण्ड सायन्स कॉलेज, शिरपूर यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्हास्तरीय पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे आयोजन २८ मे २०२६ रोजी आर. सी. पटेल सेमिनार हॉल फार्मसी कॅम्पस, करवंद नाका, शिरपूर येथे सकाळी ९ ते ४ या कालावधीत करण्यात आले आहे.

या मेळाव्यात दहावी उत्तीर्ण/बारावी/आय.टी.आय./बी.ए./बी.कॉम/ एम.कॉम/ बी.एससी./ग्रॅज्युएट/ पोस्ट ग्रॅज्युएट/ आयटीआय ऑफ ट्रेंड/बीएससी/ एमएससी/ डी-फार्मा, बी-फार्मा, एम-फार्मा, डिप्लोमा/डिप्लोमा इंजिनिअर /बी.ई/ डिप्लोमा ग्री/बी. एसस्सी. ॲग्री/ एम.एस.सी. ॲग्री या पात्रताधारक उमेदवारांसाठी १६७० रिक्तपदे उपलब्ध असून प्रत्यक्ष मुलाखतीसाठी विविध ३५ कंपन्या व आस्थापनांचे प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. तसेच, कौशल्य विकास व स्वयंरोजगाराबाबत विविध महामंडळांचे स्टॉल्स लावून विविध अर्थसहाय्य योजनांचे मार्गदर्शन करण्यात येणार आहे, अशी माहिती कौशल्य विकास रोजगार व उद्योजकताचे प्रभारी सहायक आयुक्त चंद्रकांत दुसाने यांनी शासकीय प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

या मेळाव्यासाठी विविध ३५ नामांकित कंपन्यांचे नियुक्ती अधिकारी उपस्थित राहणार असुन पात्र उमेदवारांच्या चाचणी व मुलाखती घेऊन विविध पदांसाठीच्या रिक्त जागांसाठी निवड व भरती करणार आहेत.

या संधीचा बेरोजगार उमेदवारांनी जास्तीत जास्त लाभ घ्यावा. तसेच, रोजगार इच्छुक उमेदवारांनी याचा लाभ घेण्यासाठी किमान पाच प्रतीत अर्ज/बायोडाटा आणि शैक्षणिक कागदपत्रे आधार कार्ड, सेवायोजन नोंदणी छायाप्रतीसह सकाळी १० वाजता उपस्थित राहावे. नोकरी इच्छुक उमेदवारांनी अद्यापपर्यंत सेवायोजन नोंदणी केली नसल्यास www.rojgar.mahaswayam.gov.in या संकेतस्थळावर नोकरी साधक म्हणून नोंदणी करावी. तसेच, यापूर्वी महारोजगार वेब पोर्टलवर नोंदणी केली असल्यास वरील सुधारीत संकेतस्थळावर आपला १५ अंकी नोंदणी क्रमांक टाकून लॉगइन करावे आणि मोबाईल व आधार क्रमांक पडताळणी करावी. तसेच, या वेबपोर्टलवर लॉग-इन करुन जॉब फेअर टॅबवर क्लिक करुन जिल्हास्तरीय पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा (ऑफलाईन- १/ २०२६-२७) या मध्ये जाऊन पात्रतेप्रमाणे विविध कंपन्यांच्या उपलब्ध रिक्तपदासाठी ॲप्लाय करावे, यासाठी काही अडचण आल्यास कार्यालयीन दूरध्वनी व व्हॉटस्अप क्रमांक ०२५६२-२९५३४१ वर संपर्क करावा. या मेळाव्यास नोकरी इच्छुक उमेदवारांनी उपस्थित राहुन मुलाखती द्याव्यात आणि या रोजगार संधीचा लाभ घ्यावा, असे आवाहन श्री. दुसाने यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी वेबसाईट : https://www.mahaswayam.gov.in पोर्टल संदर्भात संदिप बोरसे ९०९६०९७५२४, आणि https://www.ncs.gov.in पोर्टल संदर्भात पियुष परिहार ८००३३४३९४४वर संपर्क साधावा. तसेच कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागामार्फत महास्वयम (www.mahaswayam.gov.in) पोर्टलच्या विविध लाभार्थी घटक (स्टेक होल्डर्स) जसे उमेदवार/ उद्योजक/ नियोक्ते/ इ. यांना संकेत स्थळावर नोंदणी करणे, नोंदणीचे अद्ययावती करणे, रिक्तपदे अधिसूचित करणे, रिक्तपदास अनुसरुन ॲप्लाय करणे, राज्यातील युवक व विद्यार्थी यांना करिअरविषयक संधीची माहिती, रोजगार मेळावे व रोजगार प्रोत्साहन कार्यक्रम यामध्ये इच्छुकता दर्शविणे, विविध प्रशिक्षण संस्था, स्टार्टअप इ. विविध ऑनलाईन सेवा सुविधा उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहे. या ऑनलाईन सेवा घेतांना लाभार्थी घटकांना येणाऱ्या अडचणी/ तकारींची निराकरण करण्यासाठी मुख्यमंत्री हेल्पलाईन अंतर्गत १८ ऑगस्ट, २०२३ पासून हेल्पलाईन सुरु करण्यात आले आहे. या हेल्पलाईनचा टोल फ्री क्रमांक १८००१२०८०४० असा आहे. या हेल्पलाईनची वेळ सकाळी ८ ते रात्री ८ वाजेपर्यत उपलब्ध आहे.

## अखिल भारतीय अग्रवाल संघटनेची इंदूरला ३०, ३१ मेस राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक



धुळे – अखिल भारतीय अग्रवाल संघटनेच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची दोनदिवसीय बैठक मध्य प्रदेशातील इंदूर येथे होत आहे. येत्या ३० व ३१ मेस होणाऱ्या या महत्त्वाच्या बैठकीत समाजहिताच्या विविध विषयांवर चर्चा होणार असून, बैठकीत अखिल भारतीय अग्रवाल संघटनेचे देशभरातील प्रदेशाध्यक्ष, प्रदेश महामंत्री, राष्ट्रीय पदाधिकारी, राष्ट्रीय कार्यकारिणी सदस्य तसेच विविध आमंत्रित सदस्य सहभागी होणार आहेत, अशी माहिती संघटनेचे वरिष्ठ उपाध्यक्ष विनोद मित्तल यांनी दिली.

श्री. मित्तल यांनी याबाबत प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे, की राष्ट्रीय कार्यकारिणीची दोनदिवसीय बैठकीत समाजहिताशी संबंधित विविध विषयांवर सखोल चर्चा करून महत्त्वपूर्ण निर्णय घेतले जाणार आहेत. तसेच आगामी काळात संघटनेमार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध सामाजिक व राष्ट्रीय उपक्रमांची रूपरेषाही निश्चित करण्यात येणार आहे. अग्रवाल समाजाच्या राजकीय सहभागाबाबतही बैठकीत गांभीर्याने चर्चा केली जाणार आहे. सध्या समाजासमोरील विविध समस्या वाढत असून, त्यावर विचारमंथन करून योग्य दिशा देण्याचे कार्य या बैठकीतून केले जाणार आहे.

महाराष्ट्र राज्य अग्रवाल संमेलनाचे अध्यक्ष विजयकुमार चौधरी यांनी सांगितले, की संघटनेला अधिक बळकट करण्यासाठी तसेच अग्रवाल समाजाला एकत्रित व संघटित करण्यासाठी ही बैठक अत्यंत महत्त्वपूर्ण ठरणार आहे. ते म्हणाले, की आगामी काळात हिमाचल प्रदेश, राजस्थान, उत्तराखंड तसेच महाराष्ट्र आणि गुजरात राज्यात संघटनेचा विस्तार करण्यावर भर दिला जाणार आहे. यासोबतच विविध राज्यांमध्ये राष्ट्रीय कार्यकारिणीच्या बैठका आयोजित करण्याचे नियोजनही सुरू आहे. दरम्यान, राष्ट्रीय कार्यकारिणीच्या या बैठकीला महाराष्ट्रातील पदाधिकाऱ्यांसह समाजबांधवांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन वरिष्ठ उपाध्यक्ष मित्तल यांनी केले.

# धुळे जिल्ह्यात पॅलेटिव्ह केअर प्रशिक्षणास प्रारंभ

धुळे (जिमाका) – जिल्हा रुग्णालयासह जिल्ह्यातील विविध रुग्णालयांमध्ये पॅलेटिव्ह केअर विषयक प्रशिक्षणास सुरुवात झाली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. रवींद्र सोनवणे यांनी ही माहिती दिली आहे.

सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांच्या मार्गदर्शनाखाली राज्यात पॅलेटिव्ह केअर विषयावरील हॅण्डस ऑन प्रशिक्षण राबविण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार जिल्ह्यात जिल्हाधिकारी भाग्यश्री विसपुते, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अजिज शेख, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. सोनवणे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके यांच्या मार्गदर्शनाखाली प्रशिक्षण सुरू झाले. यानिमित्त उपजिल्हा रुग्णालय, शिरपूर येथे वैद्यकीय अधीक्षक डॉ. सुनील पावरा यांच्या उपस्थितीत पॅलेटिव्ह केअर विषयावरील प्रशिक्षण कार्यक्रम झाला. शिरपूर तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांतील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक, परिचारिका यांच्यासह कर्मचारी सहभागी झाले होते.

यावेळी डॉ. राहुल नेरकर यांनी पॅलेटिव्ह केअरची संकल्पना, उद्दिष्टे, गंभीर व असाध्य आजारग्रस्त रुग्णांची सर्वसमावेशक सेवा, घरगुती पातळीवरील काळजी, वेदना व्यवस्थापन, लक्षण नियंत्रण, रुग्ण व कुटुंबीयांचे समुपदेशन, पॅलेटिव्ह सेवांच्या अंमलबजावणी याविषयावर, डॉ. गौरव नेणे यांनी वैद्यकीय दृष्टिकोनातून पॅलेटिव्ह केअरमधील रुग्ण मूल्यांकन, वेदना नियंत्रण, लक्षण व्यवस्थापन, दीर्घकालीन व असाध्य रुग्णांची सेवा तसेच एन्ड –ऑफ – लाईफ केअर याविषयी, डॉ. स्वप्नील देवरे यांनी पॅलेटिव्ह रुग्णांमध्ये तोंडी आरोग्याचे महत्त्व, मौखिक स्वच्छता, तोंड कोरडे पडणे, खाण्यातील अडचणी, तोंडी संसर्ग प्रतिबंध व व्यवस्थापन याविषयावर, डॉ. जगदीश झिरे यांनी गंभीर आजारग्रस्त रुग्णांचे मानसिक आरोग्य, नैराश्य, चिंता, भावनिक आधार, कुटुंबीयांचे समुपदेशन, संवाद कौशल्य व मानसशास्त्रीय सहाय्य याविषयी, तर डॉ. शशांक भराडे यांनी पॅलेटिव्ह केअरमधील फिजिओथेरपीचे महत्त्व, हालचाल क्षमता वाढविणे, स्नायू ताण कमी करणे, श्वसन व्यायाम, बेडरीडन रुग्णांचे पुनर्वसन, पोझिशनिंग तंत्र व दैनंदिन कार्यक्षमतेत सुधारणा याबाबत मार्गदर्शन केले.

पॅलेटिव्ह केअर ही गंभीर व असाध्य आजारांनी ग्रस्त रुग्णांना शारीरिक, मानसिक, सामाजिक व भावनिक आधार देणारी सर्वसमावेशक सेवा असून रुग्णांचे जीवन अधिक सुसह्य, सन्मानपूर्वक व गुणवत्तापूर्ण करण्यासाठी विशेष महत्त्व सांगण्यात आले.

या प्रशिक्षणादरम्यान सहभागी आरोग्य कर्मचाऱ्यांना प्रत्यक्ष उदाहरण, हॅण्डस ऑन पद्धती, रुग्ण संवाद कौशल्य, बहुविभागीय समन्वय, समुदाय आधारित सेवा आणि गुणवत्तापूर्ण रुग्ण सेवेचे महत्त्व सांगितले. या प्रशिक्षणाच्या यशस्वितेसाठी रिंकू राऊत, संघमित्रा कोकणी, उपजिल्हा रुग्णालयातील अधिकारी व कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले.

जिल्हा रुग्णालयात अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. महेश भडांगे यांच्या उपस्थितीत प्रशिक्षण कार्यक्रम झाला. यावेळी धुळे तालुक्यातील सर्व प्राथमिक आरोग्य केंद्रे व उपकेंद्रांतील वैद्यकीय अधिकारी, आरोग्य सेवक, परिचारिका, आरोग्य कर्मचारी सहभागी झाले होते. यावेळी डॉ. नेरकर, डॉ. विकास बोरसे, डॉ. नितीन पाटील, डॉ. झिरे, डॉ. भराडे यांनी मार्गदर्शन केले.

# सुकापूरला जन भागीदारी अभियानांतर्गत जनसुनावणी

धुळे (जिमाका) – एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, धुळे यांच्यातर्फे 'जन भागीदारी अभियान – सर्वात दूर, सर्वात पहिले' या उपक्रमांतर्गत सुकापूर (ता. साक्री) येथे विशेष जनसुनावणी व जनसंवाद कार्यक्रम नुकताच झाला. धुळे प्रकल्पाचे प्रकल्प अधिकारी प्रमोद पाटील, परिसरातील लोकप्रतिनिधी, सहाय्यक प्रकल्प अधिकारी, शिक्षण विस्तार अधिकारी, निरीक्षक, आरोग्य विभागाचे अधिकारी, कर्मचारी, ग्रामस्थ उपस्थित होते.

श्री. पाटील यांनी ग्रामस्थांशी संवाद साधला. यावेळी क्यूआर (ठ) कोड आधारित ऑनलाइन तक्रार नोंदणी सुविधा प्रशासनाकडून उपलब्ध करून देण्यात आली होती. या प्रणालीमुळे तक्रारींचे पारदर्शक, सुलभ व जलद निवारण होण्यास मदत होणार आहे. यावेळी आदिवासी बांधवांच्या अडी– अडचणी जाणून घेत शिक्षण, आरोग्य, रोजगार तसेच वैयक्तिक लाभाच्या विविध योजनांबाबत मार्गदर्शन करण्यात आले. तसेच योजनांविषयी माहितीपत्रकांचे वितरणही करण्यात आले. या उपक्रमामुळे दुर्गम भागातील आदिवासी समाजापर्यंत शासनाच्या योजना प्रभावीपणे पोहोचण्यास आणि त्यांच्या समस्यांचे तातडीने निवारण करण्यास मदत होईल, असा विश्वास उपस्थित मान्यवरांनी व्यक्त केला.

# भरमसाठ व्याज वसुली करीत आर्थिक शोषण, अवैध सावकाराचा बंदोबस्त करा-प्रविण पाटील

धुळे: अवैध सावकारी करून भरमसाठ व्याज वसूल करत आर्थिक शोषण केल्याचा आरोप करत प्रविण त्र्यंबक पाटील (रा. खोरदड, ता. धुळे) यांनी आज पत्रकार परिषदेत न्यायाची मागणी केली. शहरातील साक्री रोडवरील धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या सभागृहात आयोजित पत्रकार परिषदेत त्यांनी व्यथा मांडली.

प्रविण पाटील यांनी सांगितले की, सेवानिवृत्त जवान पृथ्वीराज ग्यानदेव पाटील (रा. खोरदड, ता.धुळे, ह.मु. मोहाडी उपनगर, धुळे) हा कोणताही वैध सावकारी परवाना नसताना सावकारी व्यवसाय करीत आहे. घेतलेल्या उसनवारी रक्कमेचे मुद्दल व त्याहून अधिक दुप्पट व्याज परतफेड करूनही अतिरिक्त पैशांची मागणी करण्यात येत असून आर्थिक पिळवणूक केली जात आहे. याप्रकरणी धुळे तालुका पोलिस ठाण्यात तक्रार दिली होती. मात्र दखल घेतली गेली नसल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच अवैध सावकारीबाबत निबंधक कार्यालयातही तक्रार दाखल केली असून त्यावर सुनावणी सुरू असल्याचे सांगितले. पृथ्वीराज पाटील याला राजकीय पाठबळ असल्याचा आरोपही प्रविण पाटील व त्यांच्या कुटुंबीयांनी केला. सुरुवातीला दोन टक्के व्याज सांगण्यात आले होते, मात्र प्रत्यक्षात दहा टक्क्यांप्रमाणे वसुली करण्यात आल्याचा दावा त्यांनी केला. कुटुंबाच्या जीवितास धोका असल्याने पोलिस संरक्षण द्यावे तसेच महाराष्ट्र सावकारी (नियमन) अधिनियम व भारतीय न्याय संहितेअंतर्गत पृथ्वीराज पाटील याच्याविरोधात गुन्हा दाखल करून कारवाई करावी, अशी मागणी केली. कारवाई न झाल्यास आम्ही सामुहिक आत्महत्या करू, असा इशाराही यावेळी प्रविण पाटील, हेमांगी प्रविण पाटील यांनी दिला.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजना विद्यार्थ्यांना वसतिगृह प्रवेशासाठी आधी अर्ज करणे बंधनकारक

धुळे (जिमाका) – भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचा लाभ घेण्यासाठी शासकीय वसतिगृहात प्रवेशासाठी अर्ज करणे बंधनकारक आहे, असे समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त संजय सैंदाणे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकान्वये कळविले आहे.

अनुसूचित जाती आणि नवबौद्ध प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दिलासा देणाऱ्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेच्या नियमात समाजकल्याण विभागाने महत्वपूर्ण बदल केला आहे. नवीन नियमानुसार आता स्वाधार योजनेचा लाभ मिळण्यासाठी विद्यार्थ्यांनी आधी शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळविण्यासाठी अर्ज करणे बंधनकारक करण्यात आले आहे. शासकीय वसतिगृहात प्रवेश न मिळाल्यासच विद्यार्थी स्वाधार योजनेच्या लाभासाठी पात्र ठरणार आहेत.

विद्यार्थ्यांनी स्वाधार योजनेसाठी अर्ज करण्यापूर्वी समाजकल्याण विभागाच्या शासकीय वसतिगृह प्रवेशाच्या ऑनलाइन https:// hmas.mahait.org या पोर्टलवर अर्ज करणे आवश्यक आहे. गुणवत्तेनुसार किंवा जागेअभावी विद्यार्थ्याला शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळाला नाही, तरच त्याला 'स्वाधार' योजनेचा अर्ज सादर करता येईल. जे विद्यार्थी वसतिगृह योजनेचा अर्ज भरणार नाहीत. त्यांना 'स्वाधार' व वसतिगृह दोन्ही योजनेचा लाभ मिळणार नाही. ज्या तालुक्यांमध्ये शासकीय वसतिगृहे नाहीत, अशा तालुक्यात शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी हा नियम शिथील केला आहे. शैक्षणिक वर्ष २०२६–२७ मध्ये आधी शासकीय वसतिगृहासाठी अर्ज ऑनलाइन प्रणाली सुरु झाल्यानंतर वेळेत नोंदवावा. जेणेकरून भविष्यात स्वाधार योजनेचा लाभ घेताना कोणतीही तांत्रिक अडचण येणार नाही, असेही सहायक आयुक्त श्री. सैंदाणे यांनी म्हटले आहे.

# आर. सी. पटेल महाविद्यालयात जिल्हास्तरीय पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळाव्याचे २८ रोजी भव्य आयोजन

शिरपूर – आर. सी. पटेल कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, शिरपूर येथे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, धुळे यांच्या संयुक्त विद्यमाने गुरुवार, दि. २८ मे २०२६ रोजी जिल्हास्तरीय पंडित दीनदयाल उपाध्याय रोजगार मेळावा आयोजित करण्यात आला आहे. या मेगा ओपन जॉब फेअरमध्ये ३० पेक्षा अधिक नामांकित कंपन्या सहभागी होणार असून जिल्ह्यातील युवक–युवतींसाठी रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध होणार आहेत.

या रोजगार मेळाव्यात एस. व्ही. के. एम. संचालित तपनभाई मुकेशभाई पटेल मेमोरिअल हॉस्पिटल अँड रिसर्च सेंटर खर्दे बु. ता. शिरपूर, टाटा मोटर्स पुणे, बॉश लिमिटेड नाशिक, बजाज ऑटो पुणे, स्कोडाऑटो व फॉक्सवॅगन संभाजीनगर, लेग्रँड जळगाव, हिताची जळगाव, डेटामॅटिक्स नाशिक, कॉजेंट ई–सर्व्हिसेस नाशिक, मॅक्लिओड्स फार्मा वापी, सिरोणड्रग्स मुंबई, एच.डी.एफ.सी. बँक शिरपूर, क्सिस बँक शिरपूर, आय.डी.एफ.सी.बँक शिरपूर, श्रीराम फायनान्स शिरपूर, स्टार हेल्थ नंदुरबार, केअर हेल्थ धुळे, आय.आय.एफ.एल गोल्ड लोन शिरपूर यांच्या सह विविध आयटी, बँकिंग,फायनान्स आणि ई–सेवा क्षेत्रातील नामांकित कंपन्या सहभागी होणार आहेत. सदर रोजगार मेळाव्यास इयत्ता दहावी, बारावी, आयटीआय, डिप्लोमा, पदवीधर तसेच पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केलेले उमेदवार सहभागी होऊ शकतात. उमेदवारांनी आपल्या शैक्षणिक कागदपत्रांच्या प्रती, बायोडाटा, पासपोर्ट आकाराचे फोटो व आवश्यक प्रमाणपत्रांसह सकाळी ९ वाजता जिल्ह्यातील जास्तीत जास्त युवक–युवतींनी या रोजगार मेळाव्यास उपस्थित राहून उपलब्ध रोजगार संधींचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.हितेंद्र महाजन, उपप्राचार्य डॉ.ए.एम.पाटील, उपप्राचार्य डॉ.आर.डी.जाधव, ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग प्रमुख प्रा.बी.एस.पंचभाई, ट्रेनिंग प्लेसमेंट ऑफिसर हर्षल बडगुजर व प्रा.प्रशांत टोकशा यांनी केले आहे. या मेळाव्यात विविध कंपन्यांकडून थेट मुलाखती घेण्यात येणार असून पात्र उमेदवारांची निवड जागेवरच करण्यात येणार आहे. ग्रामीण व आदिवासी भागातील युवक–युवतींना रोजगाराच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी हा रोजगार मेळावा उपयुक्त ठरणार असल्याचे महाविद्यालय प्रशासनाने सांगितले. रोजगार मेळाव्याच्या अधिक माहिती साठी महाविद्यालयातील ट्रेनिंग प्लेसमेंट विभाग येथे संपर्क साधावा असे कळविण्यात आले आहे.

# स्वविश्वास पद्धती

**विशेष लेख...**

शुन्यातून साम्राज्य निर्माण करणार्या लोकांच्या मेंदुत एखादी स्पेशल चीप बसवलेली असते का? जी त्यांना एक्स्ट्रा ऑर्डीनरी बनवते? धीरुभाई अंबानी म्हटलं की काय आठवतं? - पैसा, प्रगती, झपाटलेपणा, संपत्ती! तेच जेआरडी टाटा म्हटलं की - पैशासोबतच सचोटी, दानशशूरपणा आणि मुल्यांची जपणुक! स्टीव्ह जॉब्ज म्हणजे - गॅझेटच्या जगातली क्रांती! तेंडूलकर किंवा अमिताभ म्हणजे शिस्त, प्रचंड आणि कठोर परिश्रम! जगाला प्रदुषणमुक्त करण्याचं स्वप्न बघणारा निकोल टेस्ला माहितीये? जगप्रसिद्ध व्हर्जिन ग्रुपचा मालक 'रिचर्ड ब्रॅन्सन'? बारा बारा उद्योगामध्ये एक नंबरवर असलेला हा माणुस तुम्हाला नेहमी समुद्रकिनार्यावर मजा करताना दिसेल! ह्या लोकांनी जगाला प्रभावित केलं ह्याचं कारण काय? ह्या लोकांमधे असं काय वेगळं होतं, जे इतर लोकांकडे नव्हतं! बिलीफ सिस्टीम! तुम्हाला त्या पायाला दोरखंड बांधलेल्या हत्तीची गोष्ट माहितीये? त्याच्या मनावर लहानपणापासून बिंबवलेलं असतं, की तो दोरखंड तोडू शकत नाही, आणि हा जगातला सर्वात शक्तिशाली प्राणी शेळी बनून जगतो, केवळ त्याच्या बिलीफ सिस्टिम मुळे!

आपल्या आयुष्यात आलेली संकटं, अपयशं आपल्याला असं भासवतात, की आपण दुर्बळ आहोत, पण आपण समजतो त्यापेक्षा कितीतरी जास्त शक्तीचा प्रचंड साठा आपल्या मनात आणि शरीरात दडलेला असतो. बिलीफ सिस्टीमचं एक उदाहरण देतो, समजा, तुम्ही तुमच्या नातेवाईकाच्या घरी एका कार्यक्रमात गेला आहेत, जेवणे चालू आहेत वाढण्यात तुम्हीही त्या परिवाराला मदत करत आहात आणि कोणीतरी सांगतं, जा बरं, किचनमधून तेवढं मीठ घेऊन ये! तुम्ही किचन मध्ये जाता, पण मनात विचार येतो, इथे मी नवीन आहे,मला यांच्या घरातलं मीठाचं भांडं कसं सापडेल, बरं? अस्ताव्यस्त किचनमध्ये आपल्याला ते मीठाचं भांडं दिसतच नाही, आपण रिकाम्या हाताने परत आलेलं पाहून ती व्यक्ती म्हणते, अरे समोरचं तर ठेवलेलं आहे, आणि आपल्या हाताला धरुन ती किचन मध्ये येऊन भांडं दाखवते, आणि मीठाचं भांडं एकदम समोरच असतं, आपल्याला ते आधी सापडत नाही कारण आपण स्वतःला ऑर्डर दिलेली असते, की मला ते सापडणार नाही आणि आपलं अंतर्मन अगदी तसचं घडवतं. बिलीफ सिस्टीम माणसाला यशाच्या शिखरावर पोहचवते किंवा त्याची धुळधाण सुद्धा करते, चांगली बिलीफ सिस्टीम म्हणजे, 'माझ्याकडे काय नाही', हे न पाहता, 'माझ्याकडे काय काय आहे?' याचा विचार करणं! रजनीकांत कंडक्टर होता, त्याच्याकडे हिरोसाठी लागणारा गोरागोमटा, लोभस चेहरा नव्हता, पण त्याच्याकडे स्टाईल आणि डायलॉग डिलीव्हरी होती, त्याने त्याच्यावर फोकस केला आज तो जगातला असा एकमेव अभिनेता आहे. ज्याचे पिक्चर जपानमध्येही हाऊसफूल्ल होतात. अमिताभला सांगण्यात आलं होतं, तुझी उंची तुझा हिरो बनण्यातला अडसर आहे. अनेक रिजेक्शन नंतरही अमिताभ निराश झाला नाही त्याने स्वतःला विचारलं माझ्याकडे काय चांगलं आहे? त्याने असा काही आवाज कमवला दोन मिनीटांच्या निवेदनासाठी आज त्याला करोडो रुपये ऑफर होतात. जेफ बेजोस असो वा जेक मा, स्टीव्ह जॉब्ज असो वा बिल गेटस. नारायण मुर्ती असो वा नरेंद्र मोदी. दिपीका पदुकोन असो वा माधुरी दिक्षीत. महेंद्रसिंग धोनीपासून संदीप महेश्वरी पर्यंत. स्वामी विवेकानंदांपासून, विवेक बिंद्रांपर्यंत. कोणतही, तुमच्या फेव्हरेट असलेलं कोणतंही कॅरॅक्टर तुमच्या डोळ्यासमोर आणून बघा, त्याच्या यशाचं उत्तर तुम्हाला त्याच्या बिलीफ सिस्टीममध्ये सापडेल. तर मित्रांनो,यशस्वी आणि आनंदी आयुष्य जगण्याच्या बाबतीतही ही बिलीफ सिस्टीम आपल्याला एकतर खूप मदत करते, किंवा आपल्या मार्गात आडवी येते, ज्याचा बिलीफ खूप सशक्त आहे, ती व्यक्ती आपल्या आयुष्यात चमत्कार घडवू शकते. असे कित्येक अविश्वसनीय चमत्कार मी माझ्या आयुष्यात कित्येकदा अनुभवले आहेत,ङ्गआणि रोज कित्येक जणांसोबत ते घडतानाही पाहतो आहे, तुमची बिलीफ सिस्टीम कशी आहे? ती तुम्हाला साथ देते की नाही? का तीच्या मागे तुम्ही फरफटत जात आहात? लॉ ऑफ अट्रॅक्शन, व्हिज्युवलायजेशन, स्वसंमोहन, अफर्मेशन अशा अनेक पद्धती माणसाचा बिलीफ सिस्टीम बदलवण्यासाठी उपयुक्त आहेत. बिलीफ सिस्टीमला मजबूत करण्यासाठी, आपल्या स्वप्नांच्या पंखांना अतुट विश्वासाचं बळ देण्यासाठी, उत्तम जाणकार व अभ्यासू समुपदेशक मोठी मदत करू शकतात. तुमची बिलीफ सिस्टीम उत्तुंग भरारी घेवो यासाठी मनःपुर्वक शुभेच्छा !.... ज्याची बिलीफ सिस्टीम स्ट्रॉंग... त्याला या जगात अशक्य असे कांहीच नाही.... हा लेख वाचल्यावर तुम्हीच ठरवा तुमच्याकडे काय आहे आणि आपलं उद्दिष्ट गाठण्यासाठी आपण त्याचा कसा उपयोग करू शकतो.

# आरती केल्यावर स्वत:भोवती गोल फिरण्याचं काय आहे महत्व?

आपण सगळेच वेगवेगळ्या प्रसंगी देवाचं रूप पाहत, हातात टाळ घेत किंवा टाळ्या वाजवत देवाची मनोभावे आरती केली असेलच. पण तुम्हाला माहित आहे का, आरतीचं नेमकं महत्त्व काय? आणि आरतीमध्ये स्वतः भोवती का फिरतात? नाही ना ! आपल्या पुराणात मात्र याविषयी विस्तृत माहिती दिली गेली आहे. चला तर मग आजच्या लेखात आरतीविषयी या सगळ्या प्रश्नांची उत्तरं आपण जाणून घेऊयात.ङ्गहिंदू धर्मात देवाची पूजा केल्यानंतर आरती केली जाते. स्कंद पुराणात आरतीचं महत्त्व सांगितलं गेलं आहे की, प्रत्येक व्यक्तीला सगळेच धार्मिक विधी, मंत्र, येतातच असं नाही. त्यामुळे ज्या व्यक्तींना कोणत्याही प्रकारची धार्मिक विधी, मंत्र, श्लोक इ. माहीत नसेल त्यांनी केवळ देवाची आरती केली तरीही देवाची त्यांच्यावर कृपादृष्टी राहते. इतर विधीनंतर ज्या प्रकारे देव प्रसन्न होतो तसाच केवळ आरती केल्यानेही देव पावतो. आरतीला पुराणात आरात्रिक आणि नीराजन अशा दोन नावांनी संबोधलं गेलं आहे. आरती ही साधारण एखाद्या धार्मिक कार्यानंतर केली जाते. त्यामुळे पूजा किंवा कोणत्याही धार्मिक कार्यात काही त्रुटी झाली असेल, काही विधी राहिल्या असतील तर आरतीमुळे त्या त्रुटी भरून निघतात.ङ्गदेवाची आरती करणाऱ्या व्यक्तीला आपल्या पंच– प्राणांना संपूर्ण एकाग्रतेने आरतीच्या तालात सुरात स्वतःला समरस करावं लागतं. आरती करताना आरतीच्या ताटात असणारा दिवा हा त्या व्यक्तीच्या आत्म्याचं प्रतीक असल्याचंही पुराणात नमूद केलं आहे त्यामुळे आरती करताना तो दिवा अखंड तेवत राहणं आणि तो पंचमुखी असणंही महत्त्वाचं ठरतं.ङ्गआरती करताना आपल्या मुखातून येणारा प्रत्येक शब्द ही देवाची स्तुती असते त्यामुळे ते शब्द अत्यंत भावगर्भतेने आपल्या मुखातून यायला हवे तरच आरतीचा लाभ आपल्याला मिळतो.ङ्गआरती दरम्यान आपण सगळेच स्वतः भोवती गोल प्रदक्षिणा का घालतो?ङ्गयाचं स्कंद पुराणात महत्त्व सांगितलं आहे. ते म्हणजे आपल्याला जीवन प्रदान करण्यासाठी, रोज नवा दिवस दिसण्यासाठी पृथ्वीचं खूप मोठं कार्य आहे. तिच्या अस्तित्वामुळे आपल्याला जीवन मिळालं आहे. त्यामुळे तिच्या प्रति कृतज्ञ भाव व्यक्त करण्यासाठी स्वतः भोवती गोल फिरणं म्हणजे पृथ्वीला प्रदक्षिणा मारण्यासारखचं आहे. त्यामुळे आरती दरम्यान स्वतःभोवती गोल फिरणं हे पूर्वपार चालत आलं आहे.ङ्गदेवाला प्रसन्न करण्यासाठी आरती कशी असावी या विषयी देखील विस्तृत माहिती पुराणात दिली गेली आहे. आरती करताना आपल्याला हातातलं आरतीचं ताट केवळ गोल फिरवायचं नाही तर ते फिरवताना ॐ अशी आकृती निर्माण होईल असं ताट फिरवायचं आहे. म्हणजेच देवाच्या चरणापाशी चार वेळा, देवाच्या छातीपाशी दोन वेळा आणि मुखाजवळ एक वेळा. अशा पद्धतीने ॐ ही आकृती निर्माण होते हे पुराणात नमूद केलं आहे. आपण आरती करताना साधारण दिवा किंवा धूप इ. ने आरती करतो मात्र आरती ही चार प्रकारे केली जाते.ङ्गआरतीचा पहिला प्रकार म्हणजे जल आरती, दुसरा दीप आरती, तिसरा पुष्प आरती आणि शेवटी कापूर, अगरबत्ती किंवा धुपाची आरती अशा वेगवेगळ्या प्रकारात आपण आरती करु शकतो.ङ्गपुराणात आरती करण्यासाठी शुभ अशा ५ वेळा संगीतल्या आहेत.ङ्ग पहिली आरती जी सूर्योदया पूर्वी आपण केली पाहिजे तिला मंगल आरती असं म्हंटलं जातं.ङ्ग दुसरी आहे शृंगार आरती जी शक्यतो सूर्य डोक्यावर आल्यानंतर केली जाते.ङ्ग तिसरी आरती ही दुपारी देवाला नैवेद्य दाखवताना केली जाते.ङ्गचौथी आहे संध्या आरती जी संध्याकाळी केली जाते.ङ्ग पाचवी आहे शयन आरती जी रात्री देवाच्या निद्रेसाठी केली जाते.ङ्गरोज देवाची आरती केल्याचे अनेक फायदे ही आहेत.ङ्गदेवाची आरती केल्याने आपल्या भोवतालचं वातावरण शुद्ध होतं. आरतीमुळे देव जागृत होऊन त्याचा आपल्या भोवती वावर असतो त्यामुळे आपल्याला सकारात्मक ऊर्जा मिळते. आरतीच्या गायनाने, वाद्यांच्या तालाने वातावरणातील नकारात्मक ऊर्जा नष्ट होते. आरती केल्याने व्यक्तीचे पाप नष्ट होऊन तो पवित्र होतो. त्याच्या मनातील राग, द्वेष कमी होऊन त्याच्या भावना शुद्ध होतात. आरती करताना वापरलेल्या कापूरमुळे भोवतालचे सूक्ष्म कीटक नष्ट होऊन वातावरण शुद्ध होतं. श्वासाद्वारे ही हवा आपल्या शरीरात गेल्याने आपल्या रक्ताची शुद्धी होते आणि आपल्याला शांतता प्रदान होते. तर हे आहे आरतीचं महत्त्व आणि तिचे आपल्याला होणारे फायदे.

## मनपा आयुक्तांकडून जनगणना कार्याचा आढावा



धुळे – महानगरपालिकेच्या हद्दीत सुरू असलेल्या जनगणना कार्याचा आढावा घेण्यासाठी आयुक्त श्री नितीन कापडणीस यांनी प्रत्यक्ष क्षेत्रभेट देत कामकाजाची पाहणी केली. यावेळी त्यांनी साक्री रोड परिसरातील गुरुनानक सोसायटी येथे भेट देऊन प्रगणकांकडून सुरू असलेल्या घरगणना व माहिती संकलन प्रक्रियेची सविस्तर माहिती घेतली. आयुक्तनी नागरिकांशी संवाद साधत जनगणना ही देशाच्या विकासासाठी अत्यंत महत्त्वाची प्रक्रिया असल्याचे सांगितले. तसेच प्रगणकांनी अचूक व पारदर्शक पद्धतीने माहिती नोंदवावी, नागरिकांशी सौजन्याने वागावे आणि काम वेळेत पूर्ण करावे, अशा विविध सूचना त्यांनी दिल्या. यावेळी संबंधित अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. गुरुनानक सोसायटीसह इतरही भागांमध्ये भेट देऊन आयुक्त साहेबांनी जनगणना कामकाजाची पाहणी केली व आवश्यक त्या ठिकाणी मार्गदर्शन केले.

धुळे महानगरपालिकेमार्फत जनगणना प्रक्रिया सुरळीत व प्रभावीपणे राबविण्यासाठी प्रशासनाकडून विशेष लक्ष दिले जात असून प्रत्येक टप्प्यावर कामकाजाचा आढावा घेण्यात येत आहे. याप्रसंगी नियंत्रण अधिकारी श्री सागर जकातदार श्री किशोर वाघ तसेच प्रगनक उपस्थित होते

## शहरातील रात्रीचा कचरा संकलन करण्यास सुरुवात



धुळे – महानगरपालिकेच्या आरोग्य विभागामार्फत शहरातील मुख्य बाजारपेठेत रात्रीच्या वेळी कचरा संकलन करण्यास सुरुवात करण्यात आलेली आहे. यामध्ये मुख्य बाजारपेठ पाच कंदील परिसर, जुने महानगरपालिका व नवीन महानगरपालिका परिसर, शिवतीर्थ परिसर, साक्री रोड परिसर, नेहरू चौक देवपूर परिसर दत्त मंदिर देवपूर परिसर, पारोळा रोड परिसर, बस स्टँड परिसर, या व्यवसायिक भागांमध्ये संध्याकाळी ७ ते रात्री ११ वाजेपर्यंत कचरा संकलना सुरुवात करण्यात आलेली आहे. आयुक्त नितीन कापडणीस यांनी दिलेल्या निर्देशालाप्रमाणे शहरातील रहिवासी क्षेत्रामध्ये एक वेळेस व व्यावसायिक भागांमध्ये दोन वेळेस कचरा संकलन होणार आहे.

उपायुक्त हेमंत निकम यांनी दिलेल्या मार्गदर्शक सूचनेप्रमाणे रात्रीच्या वेळेस घंटागाडी व्यापाऱ्यांच्या सोयीनुसार घंटागाडी कचरा संकलन करण्यात येणार आहे. यासाठी सहाय्यक आयुक्त श्रीमती डॉ. सोनाली देवरे मुख्य स्वच्छता निरीक्षक राजेश वसावे, लक्ष्मण पाटील यांच्या नियंत्रणाखाली सर्व स्वच्छता निरीक्षक मुकादम परिश्रम घेत आहे. त्याचप्रमाणे आरोग्य विभागाने शहरातील सर्व नागरिकांना व व्यापाऱ्यांना आवाहन करण्यात आले की, आपण आपला कचरा महानगरपालिकेच्या घंटागाडीमध्येच द्यावा रस्त्यावर अथवा इतरत्र फेकू नये अन्यथा आपल्यावर दंडात्मक कारवाई करण्यात येईल यासारखे नोटीस बजावण्यात आलेली आहे. तरी आपण महानगरपालिकेत सहकार्य करावे.

## आधारभूत दरानुसार भरडधान्य नोंदणीसाठी ३१ मेपर्यंत मुदतवाढ

धुळे (जिमाका) – किमान आधारभूत किंमत खरेदी योजनेतंर्गत खरीप पणन हंगाम २०२५–२६ मध्ये केंद्र सरकारने निश्चित केलेल्या हमीभावाने भरडधान्य ज्वारी, मका व बाजरी नोंदणीसाठी ३१ मे,२०२६ पर्यंत द्वितीय मुदतवाढ देण्यात आली आहे, अशी माहिती जिल्हा पणन अधिकारी आर. एस. इंगळे यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये दिली आहे.

भरडधान्य खरेदीकरीता १५ मे,२०२६ अखेर मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र, खरीप हंगाम २०२५–२६ मधील भरडधान्य ज्वारी, मका व बाजरी मुदतवाढ मिळावी यासाठी शासनाने ३१ मे २०२६ पर्यंत भरडधान्य नोंदणी करण्यास द्वितीय मुदतवाढ दिली आहे.

नाव नोंदणीचे ठिकाण असे :धुळे सहकारी खरेदी विक्री आणि प्रक्रिया सोसायटी लि.धुळे (९९७५८ ३३७०७), शिरपूर ता. सहकारी खरेदी विक्री सोसायटी लि.शिरपूर जि. धुळे (९४२२१ २३९२९), शिंदखेडा ता.शेतकरी सहकारी संघ लि.दोंडाईचा ता.शिंदखेडा जि. धुळे (९२८४४ २९८७७), शेतकरी सहकारी संघ लि. साक्री जि.धुळे (९४२१८ ८५८६६), शेतकरी सहकारी संघ लि.नंदुरबार ता जि. नंदुरबार (९७६३२ ८६८६०), शहादा ता. सहकारी खरेदी विक्री संघ लि.शहादा, ता. शहादा जि.नंदुरबार (७७२२० १४१६५) गंगामाई कृषीपूरक सहकारी संस्था मर्यादित, नगाव ता.जि.धुळे (९६६५७ ६८७८३) वर संपर्क साधावा. वरील खरेदी केंद्रावर शेतकऱ्यांनी जास्तीत जास्त नोंदणी करुन शासकीय योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी श्री.इंगळे यांनी केले आहे.

## आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करणेसाठी धुळे जिल्ह्यातील क्रिकेटपटूंनी नावनोंदणी करण्याचे धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे आवाहन

शिरपूर / धुळे – आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर संधी निर्माण करुन देण्यासाठी जिल्हयातील प्रतिभावंत व नवोदित क्रिकेटपटूंना शोधून त्यांना एकत्र आणणे आवश्यक असल्याने अशा क्रिकेटपटूंनी धुळे जिल्हा क्रिकेट असो. मध्ये नाव नोंदणी करण्याचे आवाहन धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व सल्लागार तथा माजी आमदार राजवर्धन कदमबांडे यांनी केले आहे.

धुळे जिल्हयातील क्रिकेट विकासासाठी धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनच्या माध्यमाने जिल्हा स्पर्धा समिती व जिल्हा निवड समितीची स्थापना करण्यात आली आहे. या समितींच्या माध्यमाने जिल्हयातील ग्रामीण भागातील व तळागाळातील नवोदित क्रिकेटपटूंना हेरुन त्यांना आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करण्याची संधी प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न केला जात आहे. याच प्रयत्नाची फलश्रुती म्हणून यावर्षी सार्थक पाटील याची १४ वर्षाखालील एमसीए सेक्रेटरी संघात निवड, रोहित सोनवणे याची १९ वर्षाखालील एमसीए प्रेसिडेंट संघात निवड, संमेक जगताप याची खुल्या गटात एमसीए सेक्रेटरी संघात निवड व २३ वर्षाखालील संभाव्य महाराष्ट्र संघात निवड, कु. हितांक्षी अग्रवाल हिची बीसीसीआय आयोजित स्पीड क्विन स्पर्धेत देशात पहिल्या ३० गोलंदाजात निवड, महा टी–२० स्पर्धेत जिल्हा संघाचे ५ पैकी ४ सामन्यात विजय तसेच १६ वर्षाखालील जिल्हा संघ ८ वर्षानंतर एमसीए सुपर लिग स्पर्धेत पात्र असे उल्लेखनिय कामगिरी बजावली आहे.

नुकतीच राजवर्धन कदमबांडे यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा क्रिकेट असोसिएशन च्या कार्यालयात जिल्हा स्पर्धा समिती व जिल्हा निवड समितीच्या पदाधिकारींची बैठक घेण्यात आली. या बैठकीत सकारात्मक विचार करुन आंतरराष्ट्रीय व राष्ट्रीय पातळीवर प्रतिनिधित्व करणेसाठी जिल्हयातील प्रतिभावंत क्रिकेटपटूंना एकत्र आणण्याची बाब प्रकर्षाने लक्षात आली. जिल्हयातील क्रिकेटपटूंची नांव नोंदणी करुन त्यांची संपूर्ण माहिती जतन केली जाणारअसून या माहितीच्या आधारे त्यांना तंज्ञ मार्गदर्शकांकडून तंत्रशुध्द प्रशिक्षण दिले जाणार आहे. नोंदणी कालावधी हा ३१ मार्च २०२७ पर्यंत ग्राहय धरला जाणार आहे.

तरी जिल्हयातील इच्छूक क्रिकेटपटू यांनी नांव नोंदणीसाठी धुळे जिल्हा क्रिकेट असो., चे कार्यालय, गरुड कॉम्लेक्स, कमलाबाई कन्या शाळे समोर, धुळे येथे संपर्क साधावा असे आवाहन धुळे जिल्हा क्रिकेट असोसिएशनचे अध्यक्ष तथा माजी नगराध्यक्ष भूपेशभाई पटेल व सल्लागार राजवर्धन कदमबांडे यांनी केले आहे.




आमचे सहकारी पालघर जिल्ह्याचे शिवसेना ओबीसी / व्हीजेएनटी चे जिल्हाप्रमुख

**सचिनभाऊ धायगुडे आणि वहिनींना**

लग्नाच्या वाढदिवसाच्या दोघांना सुख समृद्धी अरोग्यदायी उदंड आयुष्य लाभो हीच ईश्वरचरणी प्रार्थना!

(दि. २५/०५/२०२६)

शुभेच्छुक

अनिल धमने पाटील

जिल्हा सचिव – व्हाईस ऑफ मिडिया पत्रकार संघ, नांदेड

संजय कुसळकर – मुख्य संपादक

रजनी कुसळकर – कार्यकारी संपादक

आणि सा. प्रजा न्याय परिवार


हे मराठी साप्ताहिक, प्रकाशक संजय अण्णा कुसळकर यांनी मुद्रक अब्दुल मलिक मोहम्मद शरीफ अन्सारी यांच्या न्यू शार्प ऑफसेट प्रिंटर्स, अप्सरा हॉटेल, नवीन बस स्टॅण्ड समोर, मालेगांव, जि. नाशिक येथे छापून सा. 'प्रजा न्याय' कार्यालय – घर नं. २६, चक्करबर्डी, शासकीय दूध डेअरी रोड, पाण्याच्या टाकीजवळ, धुळे – ४२४ ००१ येथून प्रकाशित केले आहे. संपादक, मालक, संजय अण्णा कुसळकर – भ्रमणध्वनी – ९४२२७९८०९३ / ९०२८१३६९५३. Email - kusalkars@gmail.com / prajanyay@gmail.com (कायदेशीर सल्लागार – ॲड. उमेश विठ्ठल सुर्यवंशी)
(या वृत्तपत्रातील लिखानाशी मालक/प्रकाशक/संपादक सहमत असतीलच असे नाही.) (कोणताही वाद धुळे न्यायालयांतर्गत)